महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअँप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २६८ वा दिनांक : २२/०८/२०२५ वार : शुक्रवार

## सप्टेंबरनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी - अंजली दमानियांचा दावा



**मुंबई** : आगामी काळात राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता असल्याने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाबद्दल काही मोठे दावे केले आहेत. सत्ताधारी एनडीएमध्ये सध्या सर्वकाही सुरळीत नसल्याचे दिसत असून, त्याचा परिणाम महाराष्ट्रातील राजकारणावरही होईल, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे. शिवाय सध्याच्या घडामोडीत एकनाथ शिंदे यांचा भाव वाढेल परंतु सप्टेंबरनंतर काय होईल सांगता येत नाही, असेही त्या म्हणाल्या.

अंजली दमानिया म्हणाल्या की, उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत एनडीएच्या उमेदवाराला सत्ताधारी घटक पक्षांचे पुरेसे समर्थन मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीच्या नेत्यांशी बोलण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे देण्यात आली आहे. या राजकीय घडामोडींमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच ते कॅबिनेट बैठकीलाही गैरहजर होते, अशी चर्चा आहे.

सप्टेंबरनंतर अनेक राजकीय घडामोडी बदलताना दिसतील. केंद्र सरकारमध्ये खुप उलथापालथ होताना दिसते. त्याचेच पडसाद महाराष्ट्रात उमटताना दिसतात. देवेंद्र फडणवीसांना त्यासाठीच जबाबदारी दिलेली आहे. आताच्या घटकेला एकनाथ शिंदे यांना स्वत:सोबत ठेवण्याचा पूर्ण प्रयत्न करा. सध्याच्या घडामोडीत एकनाथ शिंदे यांचा भाव वाढेल परंतु सप्टेंबरनंतर काय होईल सांगता येत नाही, असे अंजली दमानिया यांनी म्हटले. त्या टीव्ही ९ मराठीशी बोलत होत्या.

अंजली दमानिया यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या राजकीय भूमिकेवरही भाष्य केले. राज ठाकरे हे भविष्यात भाजपसोबतच जातील, असे स्पष्टपणे दिसत असल्याचे त्या म्हणाल्या. उद्धव ठाकरे यांच्यासोबत त्यांना राजकीय भवितव्य नाही, हे त्यांनाही कळले आहे. राज ठाकरे कधीतरी उद्धव ठाकरेंना अडचणीत आणतील. भाजपसमोर स्वत:चे महत्त्व वाढवण्यासाठी त्यांनी काही विधाने केली असली तरी, त्यांची उद्धव ठाकरेंसोबत जाण्याची कोणतीही इच्छा दिसत नाही, असेही दमानिया यांनी म्हटले.

## आसाममध्ये १८+ वयाच्या लोकांचे आधार कार्ड बनवले जाणार नाही



**दिसपूर** : आसाममध्ये 18 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांसाठी नवीन आधार कार्ड बनवले जाणार नाहीत. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी गुरुवारी सांगितले - बेकायदेशीर स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व मिळण्यापासून रोखण्यासाठी आसाम मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री हिमंता म्हणाले की, राज्यातील 18 वर्षांवरील ज्या व्यक्तींकडे अद्याप आधार कार्ड नाही, त्यांना अर्ज करण्यासाठी फक्त एक महिना दिला जाईल. त्याच वेळी, अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि चहा जमातीतील लोकांना एक वर्षासाठी आधार कार्ड मिळू शकेल.

ऑक्टोबरमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने नागरिकत्व कायद्याच्या कलम ६A ची वैधता कायम ठेवली. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील ५ न्यायाधीशांच्या घटनापीठाने यावर निकाल दिला. तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्यासह चार न्यायाधीशांनी या निर्णयाला सहमती दर्शवली होती. न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला यांनी असहमती दर्शविली.

प्रत्यक्षात, नागरिकत्व कायद्यातील कलम ६A १९८५ मध्ये आसाम करारादरम्यान जोडण्यात आले होते. या कायद्यानुसार, १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये आलेले बांगलादेशी स्थलांतरित स्वत:ला भारतीय नागरिक म्हणून नोंदणी करू शकतात. तथापि, २५ मार्च १९७१ नंतर आसाममध्ये आलेले परदेशी लोक भारतीय नागरिकत्वासाठी पात्र नाहीत.

## खासदार सुनेत्रा पवारांची संघाच्या कार्यक्रमाला उपस्थिती



**मुंबई** :खासदार सुनेत्रा पवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या महिला शाखेच्या 'राष्ट्र सेविका समिती' च्या कार्यक्रमात सहभागी झाल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे, अभिनेत्री आणि भाजपच्या खासदार कंगना राणौत यांनी ही माहिती दिली. याबाबत अजित पवारांना विचारले असता, माझी बायको सकाळपासून संध्याकाळपर्यंत कुठे जाते, त्याची मिनिट-टू-मिनिट माहिती मला नसते, असे म्हणत पत्रकारांसमोर हात जोडले.

अजित पवार यांनी नागपूर येथील रेशीमबागेत जाणे टाळले होते. मात्र, आता त्यांच्या पत्नी आणि खासदार सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रसेविका समितीच्या बैठकीला हजेरी लावल्याने मोठी चर्चा रंगली आहे. कंगणा राणौत यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याबाबत त्यांनी सोशल मीडिया फोटो शेअर माहिती दिली. या फोटोंमध्ये संघाच्या कार्यक्रमात सुनेत्रा पवार दिसल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

अजित पवार आज वर्धा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी पत्रकार परिषदेत पत्रकारांनी त्यांना सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमातील उपस्थितीबद्दल प्रश्न विचारला होता. यावर अजित पवार यांनी थोडे रागातच उत्तर देत, पत्रकारांसमोर हात जोडले. प्रश्न विचारणे हा पत्रकारांचा अधिकार आहे. पण कोणते प्रश्न विचारावे याचा विचार करावा असे ते म्हणाले. पत्रकारांनी वर्धा जिल्ह्याच्या विकासासंदर्भातील प्रश्न विचारावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अजित पवार म्हणाले, "मी विचारतो, मला माहित नाही. माझी बायको सकाळपासून संध्याकाळपर्यंत कुठे कुठे जाते हे मला मिनीट टू मिनीट माहिती नसतं. आपण आत्ताच विचारलेलं आहे. मी आता विचारतो, का गं, कुठे गेली होती?" असं खोचक उत्तर त्यांनी दिले.

पुढे बोलताना अजित पवारांनी पत्रकारांसमोर हात जोडत, "काय खरंच ना..." असे म्हटले. नंतर कपाळाला हात लावत, "तुमचा अधिकार आहे. मात्र काय आपण प्रश्न विचारावेत. अजित पवार वर्ध्यात आला आहे. आपल्या वर्ध्याच्या विकासाच्या दृष्टीने काय विचारता येईल ते सोडून दिले. कुठे अजित पवार काय म्हणेल, कुठे ब्रेकिंग न्यूज देता येईल. मग अजित पवार काय म्हणाला दाखवतील. मग तुमचे काय म्हणणे म्हणत समोरच्यांचे दाखवतील. काय चाललंय?" असे ते म्हणाले.

या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी आपले स्पष्टीकरण दिले आहे. या कार्यक्रमात मला स्नेहमिलनासाठी बोलावल होते. त्यामुळे मी तिथे गेले. तिथे संघाच्या अनुषंगाने कार्यक्रम होत, याची मला कल्पना नव्हती, असे सुनेत्रा पवार यांनी सांगितले.दरम्यान कंगना राणौत यांनी सोशल मीडियावर फोटो पोस्ट करत, निवासस्थानी आयोजित महिला शाखेच्या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. त्यांनी लिहिले, 'आज माझ्या निवासस्थानी 'राष्ट्र सेविका समिति' महिला शाखेचे आयोजन करण्यात आले. आपण एकत्रितपणे सनातन मूल्ये, हिंदू संस्कृती आणि राष्ट्रीय जाणीवेला अधिक प्रखर बनवुयात. मानवसेवा, राष्ट्र निर्माण आणि सनातन संस्कृतीच्या संरक्षणासाठी निरंतर कार्य करत राहण्याचा आम्हा सर्वांचा संकल्प आहे. महिलांची जागरुकता आणि त्यांचा सहभागच राष्ट्राला सशक्त बनवतो,'जेव्हा ओबीसी आरक्षण दिले गेले होते तेव्हा कमंडल यात्रा काय होती, हे आरएसएसच्या प्रमुखांना त्यांनी विचारले पाहिजे. सत्तेत ते गेलेत त्याची कारणे वेगळी आहेत. पण तिथे गेल्यानंतर त्यांचे विचार काही त्यांनी स्वीकारले नसतील पण, कुठेतरी त्यांच्यावर प्रेशर असेल की एखाद्या बैठकीला या, एखादा फोटो येऊद्या... म्हणजे हे आरएसएसचा विचार स्वीकारत असल्याचा संदेश जातो. एकाबाजूला तुम्ही पुरोगामी विचार म्हणता, एकाबाजूला चव्हाण साहेबांचं, शिव-शाहू-फुले- आंबेडकरांचे नाव घेता आणि दुसरीकडे आरएसएसच्या बैठकीला तुमचे प्रतिनिधी जात असतील, तर ही दुटप्पी भूमिका आहे आणि आज राजकारणात लोकांना दुटप्पी भूमिका नकोय, असे रोहित पवार म्हणालेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५


## शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरुन मराठा समाजाचं मागालेपण सिद्ध होत नाही- ॲड प्रदीप संचेती



**मुंबई (प्रतिनिधी)** : मराठा समाजाला आरक्षण देण्याला विरोध करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या असुन शेतकऱ्यांच्या आत्म हत्यावरुन मराठा समाजाचं मागालेपण सिद्ध होत नाही, याचिका कर्त्यानचा दावा करण्यात आला असुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या वरुन मराठा समाजाचं मागासलेपण सिद्ध होत नाही असा दावा विधीज्ञ प्रदीप संचेती यांनी उच्च न्यायालय मुंबई येथे केला आहे. मराठा समाजातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्म हत्यांबाबत आयोगाने सादर केलेली आकडेवारी आणि राज्य सरकारची आकडेवारी यात कमालीची तफावत आहेअसे त्यांचे म्हणणे असुन आत्महत्यां मुळे मराठा समाज हा सरसकट आर्थिकदृष्ट्या मागासअसल्याचा दावा सिद्ध होत नाही, असा दावा मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिका कर्त्यांकडून २० ऑगस्ट २०२५ बुधवारी हायकोर्टात करण्यात आला. मराठा समाज सध्या प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे असे त्यांचे म्हणणे असुन त्यामुळे मराठा समाजाला एसईबीसी कायद्या अंतर्गत दिलेलं आरक्षण आकलना पलिकडचं आहे. सर्वोच्च न्यायालयानं आरक्षणाची घालून दिलेली ५० टक्के मर्यादा मराठा आरक्षणा मुळे ओलांडली गेली आहे. इतकेच नव्हे तर मराठा आरक्षणामुळे इतर समाजाच्या आरक्षणावरही अतिक्रमण झाल्याचा दावा याचिका कर्त्यांच्यावतीने हायकोर्टात करण्यात आला आहे.

२०ऑगस्ट रोजी काय झाला युक्तिवाद : मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी बुधवारी युक्तीवाद केला. त्यांनी न्यायालयाला सांगितलं की, "सर्वच क्षेत्रात मराठा समाज पुढं आहे. अर्धवट सर्वेक्षणाच्या आधारावर मराठ्यांना आरक्षण देण्यात आले आहे असे त्यांचे म्हणणे असुन दुष्काळामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांमध्ये मराठा समाजातील शेतकऱ्यांचाच समावेश होता, असा दावा कितपत योग्य आहे ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे कारण न्यायमुर्ती शुक्रे आयोगाने दिलेली आकडेवारी आणि यापूर्वीच्या आयोगांची आकडेवारी यात मोठी तफावत आहे.महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत मराठा समाज ३२ टक्के आहे.आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक शेतकरी मराठा समाजाचे आहेत.तसेच कर्जबाजारी शेतकऱ्यांमध्ये ही सर्वाधिक शेतकरी मराठा समाजाचे आहेत.मराठा समाजा तील ८० टक्के कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रूपयां पेक्षा कमी आहे. चार्तुवर्ण व्यवस्थेत क्षत्रिय समाजात मराठा समाज मोडतो. इतर काही राज्यात क्षत्रिय मागासलेले आहेत. त्यामुळे मराठा समाजही मागास आहे असा निष्कर्ष लावण्यात आलाय. मुळात गोखले इन्स्टिट्युटच्या वतीने १कोटी ५८ लाख लोकांपैकी केवळ ५५ लाख नागरिकांची माहिती सर्वेक्षणात घेण्यात आली. उर्वरित नागरिकांची माहिती घेण्यातच आलेली आली नाही अशी माहिती वकील प्रदीप संचेती यांनी कोर्टाला दिली. १३ सप्टेंबरच्या पुढील सुनावणीतही विरोधक याचिका कर्त्यांचा युक्तिवाद सुरूच राहील असे स्पष्ट करण्यात आले आहे.मराठा समाज हा कुठल्याही बाजूनं मागास नाही,मराठा समाज हा आर्थिक व सामाजीक दुर्बल असल्याचं दाखवत या समाजाला आरक्षण देण्यात आले आहे मात्र हा समाज मागास नाही, असं याचिकाकर्ते संजीत शुक्ला यांचे वकील प्रदीप संचेती यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलं.गेली अनेक दशकं राजकारण असू देत किंवा समाजकारण मराठा समाजाचेच नेहमी वर्चस्व राहिलय.राजकारण,साखर कारखाने, शिक्षण संस्था, व्यवसाय आणि इतर सर्वच ठिकाणी याच समाजातील लोक गेली अनेक वर्ष तळ ठोकून आहेत. त्यामुळे मुळातच त्यांना आरक्षणाची गरज नाही," असा दावा वकील संचेती यांच्याकडून करण्यात आला. त्रिसदस्सीय पूर्णपीठा पुढे सुनावणी सुरू मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात आरक्षण मिळावं यासाठी राज्य सरकारने एसईबीसी कायदा तयार केला. या कायद्याच्या घटनात्मक वैधतेला हायकोर्टात आव्हान देण्यात आलंय तर मराठ्यांना आरक्षण मिळावं यासाठीही याचिका दाखल करण्यात आल्यात.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी न्यायमूर्ती रवींद्र घुगे,न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या त्रिसदस्यीय पूर्ण पीठाची स्थापना करण्यात आली असून पूर्ण पीठासमोर दिनांक २० ऑगस्ट २०२५ बुधवारी सुनावणी झाली. पुढील आठवड्यात सुरू होणाऱ्या गणेशेत्सवा निमित्त मराठा आरक्षणा बाबतची सुनावणी १३ सप्टेंबर २०२५ पर्यंत तहकूब करण्यात आली आहे. या विशेष न्यायालयात न्यायालयात याचिकाकर्ते भाऊसाहेब भुजंगराव पवार, ॲड.जयश्री लक्ष्मण पाटील, सीमा श्रीगोपाल मांधा,संजित राममिलन शुक्ला,प्रथमेश उदय ढेपले, मंगेश ससाणे आणि इतर व्यक्तींनी महाराष्ट्र शासन व राज्य सचिव सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग यांचे विरोधात जनहित याचिका,याचिका दाखल केलेली असुन मराठा समाजा च्या वतीने आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील हे मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ता असुन त्यांचे वतीने ॲड श्रेयश संजीव देशपांडे व ॲड मधुर अनिल गोलेगावकर हे कामकाज पहात आहेत.मान्यवर वकीलांचा सहभाग ॲड अरविंद दातार,ज्येष्ठ वकील अधिवक्ता गोपाल शंकरनारायणन वरिष्ठ अधिवक्ता प्रदीप संचेती,ॲड. पल्लवी बाली,आशिष मिश्रा,प्रथमेश कामत,यशओझा,कु.निझिका पिंटो, श्री. विष्णुदत्त मिश्रा,अश्विन देशपांडे याचिकाकर्त्या साठी तर निहार चित्रे आणि कु.त्रिशा चंद्रास ॲड सुभाष झा,हरे कृष्ण मिश्रा आणि सिद्धार्थ झा आणि अपेक्षा लॉ ग्लोबल, याचिका कर्ता संजीत शुक्ला यांचे वकील ॲड प्रदीप संचेती, ॲड देशपांडे सह निहार चित्रे, अनिल अंतुरकर जेष्ठ वकील अथर्व हर्षवर्धन सुर्यवंशी आणि ॲड. कशिश चेलानी व कु.कविता प्रकाश ॲड गौरव चौबे याचिका कर्त्यासाठी ॲड.लुबना अन्सारी,राकेश जे.पांडे याचिकर्त्या साठी असुन राज्य मागासवर्ग आयोगाचे सर्व बाबींमध्ये ॲड.साकेत मोने आणि अंचिता नायर आणि देवांश शहा विधी पक्षाचे सदस्य आहेत.ॲड बिरेंद्र बी सराफ, एजी.पी.पी. काकडे, जीपी.ओ.ए.चांदूरकर,अतिरिक्त जी.पी, जय संकलेचा, श्रीमती जी. आर.

रघुवंशी,एजीपी,राज्य/प्रतिनिधी, सर्व बाबीं मध्ये शासनाच्य वतीने वरिष्ठ वकील व्ही. ए. थोरात,वरिष्ठ वकील सुश्री प्राची तटके,विशेष वकीलपी.पी. काकडे, जी.पी ओ. ए. चांदुरकर, अतिरिक्त जी.पी श्रीमती जी.आर. रघुवंशीएजीपी राज्य / प्रतिनिधि दिन्यार मॅडम,वरिष्ठ वकील चिराग जे. शाह,मनिनी रॉय,श्यामसुंदर बी. जाधव,ए.वरिष्ठ वकील वाय.साखरे, उत्सव त्रिवेदी, अर्पित गुप्ता, आशिकुमार यादव, विशाल आचार्य, ॲड रवी कदम,वरिष्ठ वकील चिराग शाह, मनिनी रॉय, श्याम सुंदर बी. जाधव, सचिन पवार, आदर्श व्यास,रुचिता वर्मा, एकता ॲड. देवदत्त कामत,वरिष्ठ वकील हर्ष पांडे,हिमांशू सचदेवा पियुष तिवारी,उत्सव त्रिवेदी,आशिष कुमार यादव,अश्विनी बी.जाधव ॲड. एकता दळवी, कविता धानुका, ॲंड. जनक द्वारकादास,वरिष्ठ अधिवक्ता नम्रता विनोद,पीयूष तिवारी व झल अंध्यार्जुन, वरिष्ठ अधिवक्ता हिमांशू सचदेवा,पीयूष तिवारी,उत्सव त्रिवेदी, कु.मनिनी रॉय अर्पित गुप्ता आणि विशाल तसेच मराठासमाजाच्या वतीने मुख्य हस्तक्षेप याचिकाकर्ता डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या वतीने साठी ॲड मधुर गोलेगावकर व ॲड श्रेयस देशपांडे हे कामकाज पहात असून, ॲंड.श्रीराम पिंगळे,ॲड सूर्यजीत चव्हाण,बजरंग सोळंके,विशाखा शेलार, ॲड रूपेश के बोबडे,ॲड श्रद्धा नाकाडी यासहअनेक विधीज्ञ कामकाज पहात आहेत.

## वाचन संस्कृती रुजविण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज - प्राचार्य डॉ. विजय भोसले



**कन्नड (प्रतिनिधी)** : समाजामध्ये दिवसेदिवस वाचनाचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे. विद्यार्थी, युवक आणि पालकही मोबाईलच्या आहारी जाऊन मोबाईलच्या विळख्यात सापडले आहेत. त्यामुळे वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे. विवेकी व सुसंस्कृत समाजाच्या निर्मितीसाठी समाजातील सर्व घटकात वाचन संस्कृती रुजली तर ज्ञानाधिष्ठीत समाज निर्माण होईल, वाचन संस्कृती रुजविण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असल्याचे प्रतिपादन कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य , संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड, अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे, शाखा कन्नड , मराठी विभाग, व आजीवन शिक्षण विस्तार विभाग शिवाजी महाविद्यालय कन्नड यांच्या वतीने तिफण वाचक जागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या उदघाटन प्रसंगी उदघाटक म्हणून प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी मार्गदर्शन केले. ( ता. २१ ) मंचावर मुख्याध्यापिका श्रीमती दळवी मॅडम, डॉ. शिवाजी हुसे, संजय जाधव , लक्ष्मण वाल्डे यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यामध्ये वाचना विषयी जागृती होऊन ते वाचनाकडे वळावे हा या अभियानाचा उद्देश आहे. यावेळी अभियानाचे संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी वाचनाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले. कवी लक्ष्मण वाल्डे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास श्रीमती सोनार, प्रा. विजय भोसले यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक संजय जाधव यांनी केले तर सूत्रसंचलन त्रिभूवन सर यांनी केले. विद्यार्थी व शिक्षक मोठया संख्येनी उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५


## हैद्राबादहून आलेला पर्यटक सिंहगडावर बेपत्ता



**पुणे :** पुण्याजवळील प्रसिद्ध सिंहगड किल्ल्यावर एक दुर्दैवी घटना घडली आहे. हैदराबादहून आलेल्या एका पर्यटकाचा तानाजी कड्यावरून पाय घसरून तो खोल दरीत कोसळला. गौतम गायकवाड (24) असे या तरुणाचे नाव असून तो साताऱ्याच्या फलटण येथील मूळ रहिवासी आहे. ही घटना बुधवारी सायंकाळी घडली असून, सध्या पोलिस आणि बचाव पथकांकडून त्याचा शोध सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गौतम गायकवाड आपल्या चार मित्रांसह हैदराबादहून पुणे आणि आसपासच्या भागात फिरण्यासाठी आला होता. बुधवारी दुपारी साडेचार वाजता ते सर्व मित्र सिंहगड किल्ल्यावर पोहोचले. संध्याकाळच्या वेळी ते तानाजी कड्याच्या दिशेने गेले. तेव्हा गौतमने मित्रांना लघुशंकेसाठी जात असल्याचे सांगितले आणि तो पुढे गेला. मात्र बराच वेळ झाला तरी तो परत न आल्याने त्याच्या मित्रांनी त्याचा शोध सुरू केला.

मित्रांनी गौतमचा शोध घेणे सुरू केले असता जवळच असलेल्या हवा पॉइंटजवळ त्याची चप्पल सापडली, परंतु गौतम काही सापडेना. त्यामुळे घाबरलेल्या मित्रांनी तातडीने 100 नंबरवर कॉल करत पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत शोधाशोध सुरू केली. हवेली पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सचिन वांगडे यांनी पीएसआय दिलीप शिंदे व त्यांच्या टीमला घटनास्थळी पाठवले. हवेली आपत्ती व्यवस्थापन, मावळा जवान संघटना आणि वनविभागाचे कर्मचारी देखील मदतीसाठी दाखल झाले.

सिंहगड परिसरात गेल्या काही दिवसांपासून जोरदार पाऊस आणि वेगाने वारे वाहत आहेत. यामुळे, वाऱ्याचा वेग आणि निसरड्या जमिनीचा अंदाज न आल्याने गौतमचा पाय घसरून तो दरीत कोसळला असावा असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. बचाव पथकाने रात्री उशिरापर्यंत गौतमचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु मुसळधार पाऊस आणि अंधारामुळे त्यांना शोधकार्य थांबवावे लागले. गुरुवारी सकाळी सहा वाजता पुन्हा एकदा बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. मात्र अद्याप गौतम सापडलेला नाही. त्यामुळे या घटनेमुळे सिंहगड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. गौतम सुखरूप मिळावा, यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे.

## रोटरीचे आप्पासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील रोटरी क्लब मुरूम सिटीचे सदस्य तथा उद्योजक रोटरीयन आप्पासाहेब पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुरूम येथील जिल्हा परिषद प्रशालेतील गुणवंत, होतकरू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप गुरुवारी (ता.२१) रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वाढदिवस अभिष्टचिंतन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक विजयकुमार देशमाने होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, कंटेकुरचे सरपंच गोविंद पाटील, प्रा. डॉ. महेश मोटे, प्रा. डॉ. सुधीर पंचगले, वस्तीगृह अधीक्षक महेंद्र कांबळे, आदित्य प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. सूर्यवंशी म्हणाले की, अशा उपक्रमशीलतीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्याला गती मिळून उज्वल पिढी निर्माण होऊ शकते. अध्यक्षीय समारोप प्रसंगी देशमाने म्हणाले की, अशा कृतिशील बांधिलकीमुळे आम्हा सर्वांना याचा सार्थ अभिमान वाटतो. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होते. साहित्य वाटपाच्या कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशालेतील संतोष कडगंचे, हरिभाऊ माकणे, मोहन राठोड, क्रांती कांबळे, संगीता घुले, राजू पवार, नागनाथ कामशेट्टी, बाळासाहेब कांबळे, निर्मला परीट आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महेश मोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रवीण ठाकूर तर आभार शिवाजी कवाळे यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने पालक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## चंद्रपूरमध्ये उद्धव ठाकरेंना मोठा धक्का



**चंद्रपूर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतशा राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. काही नेते इतर पक्षातील नेत्यांना आपल्या पक्षात सामील करून घेत आहेत, तर काही स्वेच्छेने पक्ष सोडत आहेत. याच पार्श्वभूमीवर चंद्रपूरमध्ये शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.

काँग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांचे दीर अनिल धानोरकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे, त्यांच्यासोबत शिवसेनेच्या 10 नगरसेवकांनीही भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे, आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. या प्रवेशामुळे चंद्रपूरमधील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत.

अनिल धानोरकर यांच्या भाजप प्रवेशामुळे भद्रावती नगरपालिकेचे राजकारण बदलण्याची शक्यता आहे. आतापर्यंत भद्रावती पालिकेवर शिवसेना ठाकरे गटाचे वर्चस्व होते, पण अनिल धानोरकर आणि त्यांच्यासोबत 10 नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने हे वर्चस्व धोक्यात आले आहे. यामुळे धानोरकर कुटुंबात राजकीय फूट पडल्याचे स्पष्ट झाले आहे, ज्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भद्रावतीमध्ये नव्या राजकीय समीकरणांचा उदय होण्याची शक्यता आहे.

प्रतिभा धानोरकर यांचे दीर व भद्रावती नगर परिषदेचे माजी अध्यक्ष अनिल धानोरकर यांनी शिवसेना ठाकरे गटाची साथ सोडली असून आज त्यांनी भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांच्या उपस्थितीत अनिल धानोरकर यांनी पक्षप्रवेश केला. त्यांच्यासोबत 10 माजी नगरसेवकांनीही प्रवेश केला.

अनिल धानोरकर यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात शिवसेना ठाकरे गटामधून केली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी बंडखोरी करत वंचित बहुजन आघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला. या कृतीमुळे त्यांना शिवसेनेतून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. त्याचदरम्यान, त्यांच्या पत्नी आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्याशी सुरू असलेल्या कौटुंबिक वादांचीही चर्चा झाली. आता या सर्व घडामोडींनंतर अनिल धानोरकर यांनी ठाकरे गटाला पूर्णविराम देत अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश करत कमळ चिन्ह स्विकारले आहे.

रवींद्र चव्हाण म्हणाले, या सर्वांचे जनहितासाठी, आपल्या शहरासाठी योगदान राहिलं आहे. गणेश नाईक साहेब ही रस्सीखेच आहे, जितकी पाहिजे त्याहून अधिक रस्सीखेच आहे. तुमच्या सर्वांचे संबंध सांभाळून अनिल धानोरकर यांनी आपल्याकडे येण्याचे ठरवले, त्यासाठी आभार मानतो. आश्वासित करतो, आम्ही विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. आपण एका राष्ट्रीय विचारधारेबरोबर काम केलंय. आपल्या घरातील परिस्थितीची कल्पना आहे, एका कुटुंबातून तुम्ही आला आहात. मात्र, हे कुटुंब तुम्हाला वेगळे पडू देणार नाही.

अनिल धानोरकर हे भद्रावती नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष असून, त्यांनी दोन वर्षे शिवसेना ठाकरे गटाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारीही यशस्वीरित्या पार पाडली आहे. अनेक वर्षांपासून त्यांच्या नेतृत्वाखाली धानोरकर कुटुंबीयांची भद्रावती नगरपरिषदेवर एकहाती सत्ता राहिली आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने वरोरा मतदारसंघातून अनिल धानोरकर यांना उमेदवारी नाकारली होती. त्यानंतर त्यांनी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्याबाबत जाहीर नाराजी व्यक्त केली आणि वंचित बहुजन आघाडीकडून निवडणूक लढवली. आता, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनिल धानोरकर यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला आहे आणि कमळ चिन्ह स्विकारले आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५

# प्रसूती पश्चात बाळ आणि बाळंतिणीचा मृत्यू



**भंडारा** : मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक काळ असतो. या काळात आई आणि बाळाचे आरोग्य सुरक्षित ठेवणे ही सर्वोच्च गरज असते. गर्भधारणेपासून प्रसूतीपर्यंत आणि त्यानंतरच्या काळात योग्य काळजी न घेणे या दोघांसाठीही जोखमीचे कारण ठरू शकते. या पार्श्वभूमीवर शासन पंतप्रधान सुरक्षित मातृत्व सारख्या योजना राबवण्यात येतात. मात्र, ग्रामीण रुग्णालयात अत्यावश्यक सुविधांचा अभाव आणि अनेकदा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे बाळ आणि बाळंतीणीला जीव गमवावा लागत असल्याच्या अनेक घटना आजही ग्रामीण भागात घडत असतात. अशीच एक घटना भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यात घडली आहे. प्रसूती पश्चात एका बाळाचा आणि मातेचा दुर्दैवी मृत्यू झाला.

प्राप्त माहितीनुसार, लाखांदूर तालुक्यातील आसोला या गावातील रीना शहारे यांना सोमवारी रात्री लाखांदूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मंगळवारी १९ ऑगस्ट रोजी सकाळी तिला प्रसूती कळा सुरू झाल्या. सकाळी महिलेची प्रसूती झाली मात्र तिचे बाळ गर्भातच दगावल्याचे सांगण्यात आले. दरम्यान बाळंतीण महिलेला मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याने तिची प्रकृती चिंताजनक झाली. तिला भंडारा जिल्हा रुग्णालयात नेण्याचा निर्णय झाला. मात्र, वाटेतच तिचाही मृत्यू झाला. लाखांदूर हे भंडारा जिल्ह्यातील शेवटच्या टोकावरील तालुका आहे. तिथं आरोग्य सुविधेचा अभाव असल्यानं ही घटना घडल्याचा रोष आता नागरिकांकडून करण्यात येत आहे.

रीना शहारे यांना एक मुलगा आहे. दुसऱ्यांदा देखील रीना यांनी त्यांचे बाळ प्रसूतीनंतर गमावले होते. आता तिसऱ्यांदा त्या गर्भवती होत्या. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाचे मातृछत्र हरवले आहे तर कुटुंबावर देखील मोठा आघात झाला आहे. रीना यांचे पती विनायक हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात त्यामुळे त्यांची परिस्थिती बिकट त्याचो आहे अशातच पत्नी आणि नवजात बाळाचा मृत्यू हा विनायक यांच्यासाठी मोठा धक्का आहे.

१८ ऑगस्ट रोजी लाखांदूर तालुक्यातील असोला येथील एका महिलेला प्रसूती वेदना आल्यानंतर गर्भवती मातेला ग्रामीण रुग्णालयात प्रसुतीकरिता दाखल करण्यात आलं होतं. मात्र, प्रसुतीनंतर नवजात अर्भकाचा मृत्यू झाला. तर, मातेची प्रकृती चिंताजनक असल्यानं तिला भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आलं. मात्र वाटेत असतानाचं मातेचाही रुग्णवाहिकेतचं दुर्दैवी मृत्यू झालाय. ही घटना लाखांदुरात घडली. या घटनेनंतर लाखांदूर शिवसेना शिंदे गट आक्रमक झाला असून, त्यांनी २० ऑगस्ट रोजी तालुक्यातील आसोला येथे त्या मृत महिलेच्या घरी जाऊन सांत्वन पर भेट घेतली. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांना तहसीलदार यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले. सदर निवेदनात दोषी डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर निलंबन करून मनुष्यबदाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. व लाखांदूर तालुका हा जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असून या तालुक्यात आरोग्य विषयक सोयीसुविधांचा अभाव असून, या तालुक्यात ट्रामा सेंटर करण्याची ही मागणी या निवेदनातून केली.१८ ऑगस्ट रोजी तालुक्यातील असोला येथील प्रसूतीसाठी आलेल्या महिला ग्रामीण रुग्णालयात दाखल झाली. आणि त्यानंतर त्या महिलेची सोनोग्राफी बघितला असता, सोनोग्राफीमध्ये लिहिलं होतं की गर्भाशयात असलेल्या बाळाला रक्ताचा पुरवठा पुरेशा होत नसल्याने तिला ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी यांनी तिला प्रसूती अति गंभीर असल्याचे सांगितले. आणि प्रसुतीच करायची असेल तर आय. सी. यू. ची गरज अत्यंत भासेल पण ती या ठिकाणी उपलब्ध नाही आहे. त्यासाठी तुम्हाला भंडारा जावे लागेल. असेही सांगण्यात आले. मात्र त्यादिवशी अति मुसळधार पाऊस व नातेवाईक जवळ नसल्याने त्यांनी उद्याला सकाळी नेऊ असे म्हटले. नंतर दुसऱ्या दिवशी १९ ऑगस्ट रोजी पहाटे तीन वाजता चेक केला असता तिला प्रसूतीच्या कळा नव्हत्या. मात्र सकाळी तिला खूपच प्रसूतीच्या काळात जाणवायला लागल्या. प्रसूतीच्या दहा तासा अगोदर गरोदर महिलेला कळा येणे चालू होतात मात्र त्यावेळी असे झाले नाही. १९ ऑगस्ट रोजी सकाळी मीसुद्धा सकाळी दवाखान्यात उपस्थित असताना तिला खूप जोराच्या कळा आल्याने मला आमच्याच रुग्णालयातील कर्मचारी मला बोलवायला आले त्यानंतर मी धाव काढत पटकन निघालो. तिथे गेलो त्यानंतर बाळाने आतमध्ये संडास केली होती. आणि त्याला पूर्वीच रक्ताचा पुरवठा कमी होतो का त्यामुळे त्या बाळाचा प्रसूती दरम्यानच मृत्यू झाला. त्यानंतर त्या महिलेला गर्भाशयातून रक्तस्त्राव सुरू झाला आणि खूप प्रयत्न केला रक्तस्त्राव बंद करण्याचा अखेर तो काही काळाने बंद झाला त्यानंतर आम्ही तिला भंडारा रेफर केला. पण तो नियतीला मान्य नसावा अखेर लाखनी जवळ या महिलेचा पुन्हा रक्तस्त्राव सुरू झाला आणि त्यातच त्या महिलेचा मृत्यू झाला. - डॉ. दत्तात्रय ठाकरे, वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय लाखांदूर.

# महसूलमंत्री बावनकुळेंविरोधात फेसबुकवर अश्लील कमेंट



**नागपूर** : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना फेसबुकवर अश्लील भाषेत कमेंट करत शिवीगाळ करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात आरोपी जीममालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुनी कामठी पोलिस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला. किशोर चरणदास मेश्राम (४२, वाठोडा) असे आरोपीचे नाव आहे. तर नवीन कामठी येथील भाजपचे कार्यकर्ते प्रमोद गेडाम (५५) यांनी तक्रार केली आहे.

मेश्राम हा गेडाम यांचा फेसबुक फ्रेंड आहे. १६ ऑगस्ट रोजी बावनकुळे यांच्या हस्ते कामठी भाजीबाजाराजवळील धोबी घाटाचे बावनकुळे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. पवन शर्मा नावाच्या व्यक्तीने तेथील बावनकुळे यांच्या भाषणाचा व्हिडीओ फेसबुकवर शेअर केला. गेडाम यांनी दुसऱ्या दिवशी त्यांच्या अकाऊंटवरून तो व्हिडीओ शेअर केला. त्यावर मेश्रामने शिवीगाळ करीत कमेंट लिहिली.

रेती घाटातून कमिशन मिळत नाही म्हणून बावनकुळे यांनी रेती घाट बंद केले, तसेच रजिस्ट्री कार्यालयातून काहीच भेटत नसल्याने रिसेलची रजिस्ट्री देखील बंद केली, असे म्हणत मेश्रामने शिवीगाळ केली. ही कमेंट गेडाम यांनी पाहिली. बावनकुळे यांची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न यातून मेश्रामने केल्याचा आरोप गेडाम यांनी लावला व जुनी कामठी पोलिस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी आरोपी मेश्राम विरोधात गुन्हा दाखल केला आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५

# ‘बारूद’ मन, मस्तिष्क, मनगटाची दणकट कविता




ख्यातनाम कवयित्री प्राचार्य डॉ विजयालक्ष्मी वानखेडे यांचा 'बारूद'चौथा कविता संग्रह.अक्षरांचे बारूद पेरून मन मस्तिष्क,मनगटाची दणकट अभिजात संविधानीयी कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे हे काव्य बारूद.तथागताच्या पंचशील तत्वांची आखणी फुले,शाहू, आंबेडकरांच्या विचारांची बांधणी.आजच्या समकालाचीसर्वहारा माणुसकीच्या बांधिलकीची ही प्रज्ञावंत कविता विजयालक्ष्मी यांनी अतिशय चिंतन चिकित्सक विवेचक मूल्यांची जपणूक करत आपल्या सृजनशील भावनेचा संयत विद्रोह मनोभूमिका ही कविता घेऊन येते.जसे,"तुझ्या वाट्याला नाही येणार हार,तुरे, सत्कार पुरस्कार, संमेलनाध्यक्षाचा सन्मानपण तुला घेयाला जरूर येईल एखादंपुष्प विमान"...*श्रेध्दय बाबासाहेबांच्या प्रेरक प्रज्ञा प्रेरणेचे आम्ही पाईक.सविधानाचे आम्ही जातीवंत शिलेदार म्हणजे शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा.जो आजतागायत चालूच आहे.इथल्या गढूळ कुचक्या व्यवस्थेला 'संविधान'या कुरूक्षेत्रात आम्हाला निशस्त्र करायचं आहे.पण ही संविधान शस्त्र हेच आमचे श्रेयश आहे.विचारांचे बारूद पेरत ही कविता समर्थपणे आजच्या समकालीन विदारक वास्तवाच्या ठिकऱ्या उडवते आणि सामाजिक समजभान देऊन मन मनगट बळकट करते.आज सर्वहरा आंबेडकरी विचारधारेचा अनुबंध घेऊन जगणारा सामाजिक वर्ग बोट चेपे धोरणाने सैरभैर आहे.आंबेडकरी विचारांची भूमिका ठाम घेऊन जगणारा कुठेच दिसत नाही.प्रज्ञा शील करुणा अंगीकारली.ज्ञान संपादन केले. नेमके हेच बिरूद बादरू ही कविता संयत विद्रोहाने देते.आंबेडकरी समाजभान देणारी ही कविता.संवैधानिक मूलभूत दृष्टीकोन मिळालाखरा.पण आपल्यामनोभूमिकेत आंबेडकरी विचारांचा जगता पहारा असला पाहिजे हे बारूद या कवितेचा मर्मग्राही आस्वाद आहे.मेंदूवरची राख झटका, तुम्ही कोणत्या बिळात लपुन बसलात?, आता रस्त्यावर उतरले पाहिजे,कधी काळी माणसं आपली वाटायची,आता ती का धरून चाटायची!मनातला मनु आधी जाळं, त्यांना बाबासाहेब चांगलेच कळले आहेत, आणि तुम्हाला..?या साऱ्या कविता एक चिंतनाचा पट मांडतात, कारण आज कुणी आज्ञानी आडाणी नाही तर,शिक्षण वाघीणचं दूध आहे.हे प्राशन केले हो पण तो या व्यवस्थेचा भाड्या होतो आहे.गुलामीची रेंज बदलतो आहे.म्हणून ही ठणक वेदनेची मन मस्तिष्कालाच बारूद लावते आहे.जसे,"असेल तशी हिंमत तर, झाल्या गेल्या भूतकाळाला मूठमाती देऊन,अंतरातल्या स्निग्ध वाती पेटवून जाती जाळूयात आणि म्हणूयातआपण सारे भारतीय!..."(भारतीय)ही अस्सल जखमेची अवस्था कवयित्री व्यक्त करते.हासम्यक दृष्टीकोन ठेवून चळवळी चालतं आणि सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक उन्नती होतं होती.या साऱ्याच गोष्टीला पुन: छुप्याने जातीच्या कुंपणात काही सैर सांड सुटले आहेत ते फक्त फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचीमांदियाळी विचार पीठावर पोटतिडकीने मांडता आहेत.पण प्रत्येक्षात त्यांची दुतोंडी भूमिका दिसून येते. यावर विजयालक्ष्मी वानखेडे बारूदाचा सुरूंग लाऊन त्यांचे मन माथे ठिकाण्यावर आणण्याचं काम ही कविता करते.आज आंबेडकरी विचारधारेचा अजिंडा घेऊन बारूदकविता प्रखर वास्तववादी चिंतन चिकित्सक विवेचक बोलते.आजच्या शैक्षणिक धोरणवर लिहिते,"शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचे डाव आखल्या जात आहेत,सत्तेचे तुकडे तुमच्या पुढे फेकून तुमची फाटाफूट घडविण्यात येतं आहे.आणि तुम्हाला भावनिक संघर्षात गुंतवून, विचारांचे मुडदे पाडून, तुमच्या संघर्षाचेकारणच ते संपुष्टात आणत आहेत.मित्रांनो, त्यांना बाबासाहेब चांगलेच कळले आहेतआणि तुम्हाला...?"(समज)हे शाश्वत सत्य आहे.हा शड्ड यंत्री डाव उजागर करणारी ही कविता आहे. हे वेळीच थांबले पाहिजे.पाठराखण कवीश्रेष्ठ यशवंत मनोहर लिहितात,"फुले-शाहू-आंबेडकरांच्या चळवळीतून उगवलेले एक पराकोटीचे संवेदनशील मन 'बारुद' या कवितासंग्रहात आपल्याला भेटते.स्त्रीमनाच्या नैसर्गिक तहान-भूकाही या कवितेमधून सभ्यपणे व्यक्त होतात.स्त्रीला माणूसपण नाकारणारे पिंजरेही बाबासाहेब आंबेडकरांच्या मनाने ही कविता तोडते.ती अवकाश बंदिस्त करणाऱ्या सरहद्दी बेचिराख करीत खऱ्या जीवन सत्याकडे झेपावते यातूनच तिचा सुसंस्कृत आणि आंबेडकरी स्त्रीवाद साकार होतो.विजयलक्ष्मी या आंबेडकरी प्रतिभेत एक अंगभूत जबाबदारीचे गंभीर भान आहे.आणि माणूसपण गंगणभेदी करणाऱ्या मूल्यांच्या निकडीचे साहसही आहे.हा तिच्या स्त्रीवादीही माणूसकीच्या निरंतर उन्नयाच्या रुपात आपल्यापुढे उलगडतो 'रीझन आणि मोरॅलिटी' यांची अविभाज्यताच या कवितेला अंतर्विरोधविहीनतेच्या पातळीवर घेऊन जाते. विजयालक्ष्मी वानखेडेंच्या कवितेतून उगवणारा हा आंबेडकरी स्त्रीवाद मला विशेष लक्षणीय वाटतो"ही सविनय चिंतन आशय संपन्न थाप अक्षय आहे.हे उजेड पेरणी करताना कवयित्री लिहिते,"माझ्या कंठात घुसमटत आहेत.बुध्दांच्या काळजातली करूणा स्वर".'मुडद्यांचा प्राण झाला भीम माझा", 'आता भीती कशाची, आता तमा कशाची, घटनाच ढाल अमुची, तलवार भीमराया'..'हे संविधान माझे बुध्दासमान भासे, अवघ्याच भारताचे व्हावे विहार आता'.हे विहार लोकशाहीची कार्यशाळाच आहे.कवितेचा रक्तगंध माखला की,'कवितेशी ऋणानुबंध जुळला की, मरणानंतर ही तुटत नाही.असे हळवे कोंदण या कवितेचा आत्मा आहे.संविधान मिटू पाहणारे,वर्तमान किती भंयकर आहे इथे एक शब्द तिडीक येते ती अशी,*"बघा तुमच्या ही जिभा तपासा जमेल तर मेंदूवरची राख झटका आणि मारा असा एकच फटका की, तख्त पालटले पाहिजे"....* या कवितेमधून बारूद "शब्दरुपी सुरंग पेरत जाते.मेंदू मध्ये नित्य ठेव तू,फुले,शाहू आणि भीमबाबा." फुले-शाहू-आंबेडकरांनी आणि संविधानाने आपल्याला अभेद्य केलेले आहे.आपण पोलादी खडक आहोत.आंबेडकरी चळवळीने आपल्याला अंभग प्रकाशस्तंभही केलेले आहे आणि अजिंक्य भेटही केलेले आहे.हा अजिंक्यपणा कोठेही पराभूत होतं नाही.आणि कोणत्याही त्सुनामीने उध्वस्त होत नाही.या गंभीर खंबीर भूमिकेतून लिहिते,"स्त्रियांनीच घ्यावी सुत्रे हाती "हा भारतीय संविधान विधिज्ञ कायद्याचा खंमकी भाषाशैली आहे.या समकालीनात वास्तवाचे भान चिंतन देणारे आहे."ती नव्याने शिकते आहे, सुरूंग लावणे पुरूषसत्तेला,धर्मसत्तेला आणि राजसत्तेला ही"..ही अतिशय लक्षवेधी ठाम भूमिका घेऊन सृजनशील भावनेचा समाजभान देणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून विद्रोह पेरीत येते.या कवितेचे अतिल रेखाटने अजित अंभग यांचे मनस्वी आहेत."कवितेचा पदर माझ्या हातून सुट नये म्हणून सतत दक्ष.कवितेचे धारदार पाते लखलखीत ठेवणारे पती रवीराज लक्ष्मणराव वानखेडे यांना स्नेहपुर्वक.."अर्पण पत्रिका मनोज्ञ दर्शक झाली आहे.पुढील साहित्यलेखनास हार्दिक शुभेच्छा.

**बारूद:- (काव्यसंग्रह)**
**विजयालक्ष्मी वानखेडे**
**मुखपृष्ट:- डॉ श्यामल बबन सराडकर**
**परिवर्तन पब्लिकेशन, बुलढाणा**
**प्रकाशन:-१४ आक्टोबर २०२४**
**किंमत:-१२०**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**

## मराठवाड्यात कुणबी प्रमाणपत्र वाटपाचा आढावा : २२ महिन्यांत २.३६ लाख प्रमाणपत्रे वितरित



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्तालयात कुणबी प्रमाणपत्र संशोधन समितीची बैठक गुरुवारी सकाळी ११ वाजता सुरू झाली. सेवानिवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील व त्यांचे शिष्टमंडळ यांना निमंत्रित करण्यात आले होते.

समितीने मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे माहिती घेतली. बैठकीला विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, सिडकोचे जगदीश मिनियार यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

शिंदे समितीच्या सदस्यांनी छत्रपती संभाजीनगर आणि बीड जिल्ह्यांतील तहसीलनिहाय अभिलेखांची माहिती घेतली. त्यांनी तहसील व भूमी अभिलेख कार्यालयातील जुन्या अभिलेखांची पाच तास पडताळणी केली.

महसूल विभागाने गेल्या २२ महिन्यांत २ लाख ३६ हजार कुणबी जातीची प्रमाणपत्रे वितरित केली आहेत. यंत्रणेने आतापर्यंत २ कोटी २१ लाख ५२ हजार ७१९ अभिलेखांची तपासणी पूर्ण केली आहे.

पुढील आठवड्यापासून जरांगे यांनी आरक्षणासाठी आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झाले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
■ प्रोजेक्ट रिपोर्ट ■ डेझर्टेशन
■ पीएच.डी./एम.फिल.थेसिस ■ कलर प्रिंट
■ डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट ■ स्कॅनिंग
■ स्पायरल व हार्ड बायडींग ■ लॅमिनेशन
महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com